आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता

३० जून २०२४ - रविवार

**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीत मतदारांनी संविधान आणि लोकशाहीवरच्या अढळ विश्वासाचं दर्शन घडवल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मन की बात मधे प्रतिपादन

- तीन नवे फौजदारी कायदे उद्यापासून लागू होणार /फौजदारी न्याय प्रक्रियेत भारत पथदर्शी ठरेल, असा केंद्रीय कायदा आणि न्याय राज्यमंत्र्यांचा विश्वास

- महिला क्रिकेटमधे दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या कसोटी सामन्यात ८ गडी बाद करत भारताच्या स्नेहा राणा नं घडवला इतिहास.

**आणि**

- माजी फूटबॉलपटू भूपिंदर सिंग रावत यांचं निधन

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीत देशातल्या मतदारांनी संविधान आणि लोकशाही व्यवस्थेवरच्या अढळ विश्वासाचं दर्शन घडवल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज मन की बात च्या एकशे अकराव्या भागात सांगितलं. तीन महिन्यांच्या कालावधीनंतर आपल्या तिसऱ्या कार्यकाळात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज प्रथमच आकाशवाणीवर मन की बात या कार्यक्रमाच्या माध्यमातून देशवासीयांशी संवाद साधला. हा या कार्यक्रमाचा एकशे अकरावा भाग होता.

जगातली सर्वात मोठी सार्वत्रिक निवडणूक यशस्वीपणे पार पडल्याबद्दल त्यांनी निवडणूक यंत्रणा आणि मतदारांचं अभिनंदन केलं तसंच

देशवासीयांचे आभार मानले. या निवडणुकीत ६५ कोटी मतदारांनी मतदान केलं, असं कोणत्याही देशात घडलेलं नाही असं सांगून त्यांनी आपल्या निवडणूक प्रक्रियेचा गौरव केला.

धरतीमातेचं  ऋण फेडण्यासाठी, यावर्षीच्या पर्यावरण दिनानिमित्त 'एक पेड माँ के नाम' ही मोहीम सुरू केली असल्याची माहिती त्यांनी दिली. या मोहीमेअंतर्गत भारतासह जगभरातल्या  नागरिकांनी  आपल्या आईसोबत किंवा तिच्या नावानं एक झाड लावावं, या मोहिमेमुळे आपल्या आईचा सन्मान तर होईलच त्यासोबतच धरणी मातेचंही रक्षण होईल असं ते म्हणाले. सगळ्यांच्याच प्रयत्नांमुळे भारतात गेल्या दशकभरात वनक्षेत्राचा अभूतपूर्व विस्तार झाला, अमृत महोत्सव साजरा करताना देशभरात ६० हजारांपेक्षा जास्त अमृत सरोवरांची निर्मिती झाली, त्याचप्रमाणे या मोहिमेलाही आपण गती द्यावी असं आवाहन त्यांनी केलं.

पॅरीसमध्ये पुढच्या महिन्यात होणार असलेल्या ऑलिम्पिक स्पर्धेसाठी त्यांनी भारतीय खेळाडूंना शुभेच्छा दिल्या. टोकियो ऑलिम्पिकप्रमाणेच पॅरिसमध्येही आपले खेळाडू चांगली कामगिरी करतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आपण लवकरच या खेळाडूंना भेटून त्यांना प्रोत्साहन देणार आहोत, देशातल्या नागरिकांनीही चिअर फॉर भारत या हॅशटॅगचा वापर करत आपल्या खेळाडूंना प्रोत्साहन द्यावं असं आवाहन त्यांनी केलं.

आकाशवाणीच्या संस्कृत बातमीपत्राच्या प्रसारणाला आज ५० वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त त्यांनी आकाशवाणीचं अभिनंदन केलं.

या भाषेच्या जतन संवर्धनासाठी होत असलेल्या प्रयत्नांना हातभार लावायला हवा असं आवाहन त्यांनी केलं.

## होल्ड बाईट

जगभरात भारतीय संस्कृती गौरवली जात असल्याचं सांगताना त्याबाबतची अनेक उदाहरणं त्यांनी आज श्रोत्यांसमोर मांडली. कुवेत सरकारनं त्यांच्या राष्ट्रीय आकाशवाणीवर हिंदी भाषेतील विशेष कार्यक्रम सुरू केला असल्याची महिती दिली आणि त्याचा किंचितसा अंश श्रोत्यांना ऐकवला. तुर्कमेनिस्तानमध्ये उभारलेल्या जगभरातल्या २४ प्रसिद्ध कवींच्या पुतळ्यांमधे, भारताचे महान कवी गुरुदेव रवींद्रनाथ टागोर यांचाही पुतळा असणं, ही सन्मानाची बाब असल्याचं ते म्हणाले. ५ जून रोजी सुरीनाम आणि सेंट व्हिन्सेंट अँड दि ग्रेनाडाइन्स ह्या दोन कॅरिबियन देशांमध्ये तिथला भारतीय वारसा साजरा करताना, भारतीय समुदाय आगमन दिवस जल्लोषात साजरा झाल्याची माहिती त्यांनी दिली.

दहावा आंतरराष्ट्रीय योग दिन जगभरात जल्लोषात साजरा झाल्याचं सांगून ते म्हणाले की, दरवर्षी योगदिनाचे कार्यक्रम नवनवे विक्रम प्रस्थापित करत आहेत. अमेरिका, इजिप्त, म्यानमार, बहारीन, श्रीलंका, मार्शल बेटं, भूतान यांसह अनेक देशांमध्ये योग दिनानिमित्त आयोजित केलेल्या अभिनव उपक्रमांविषयी सांगतांना, सौदी अरेबियात पहिल्यांदाच एका महिलेनं योगासनांच्या सूचना देण्याच्या घटनेचाही उल्लेख त्यांनी केला. देशातल्या नागरिकांनीही योगाभ्यासाचा सराव फक्त एका दिवसापुरता न करता, नियमितपणे योगासनं करावी, तरच आयुष्यात नक्कीच सकारात्मक बदल जाणवू लागतील असं ते म्हणाले.

देशातली स्थानिक उत्पादनं जागतिक पातळीवर पोहचवण्यासाठीच्या विविध प्रयत्नांची उदाहरणं त्यांनी श्रोत्यांसमोर मांडली. अशा उत्पादनांना

जागतिक ओळख मिळवून देण्यासाठी ती माय प्रॉडक्ट माय प्राईड हा हॅशटॅग वापरून शेअर करावी, असं आवाहन त्यांनी केलं.

आदिवासी बांधव आजचा दिवस ‘हूल दिवस’ म्हणून साजरा करत असल्याची माहिती देत, प्रधानमंत्र्यांनी सिद्धो - कान्हू यांनी ब्रिटीश सरकारविरोधात दिलेल्या लढ्याचं स्मरण केलं.

लवकरच सुरु होणार असलेली जगन्नाथ यात्रा, तसंच अमरनाथ यात्रा आणि पंढरपूरच्या वारीत सहभागी होणाऱ्या भाविकांना प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या. तसंच आगामी कच्छी नववर्ष आणि आषाढी बीज सणाच्याही त्यांनी देशवासियांना शुभेच्छा दिल्या.

**<><><><><><>**

देशात उद्यापासून लागू होणाऱ्या तीन नवीन फौजदारी कायद्यांमुळे नागरिकांना सुलभपणे न्याय मिळेल, तसंच फौजदारी न्याय प्रक्रियेत भारत आगामी काळात पथदर्शी ठरेल, असा विश्वास केंद्रीय कायदा आणि न्याय राज्यमंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी व्यक्त केला आहे. भारतीय न्याय संहिता २०२३, भारतीय साक्ष्य अधिनियम २०२३, आणि भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ हे तीन कायदे उद्यापासून लागू होणार आहेत. या संदर्भात जनजागृती करण्यासाठी केंद्रीय कायदा आणि न्याय मंत्रालयानं बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यानं आयोजित केलेल्या, 'भारताची नवी फौजदारी न्याय प्रणाली : एक प्रगतिशील पाऊल' या परिषदेत ते आज बोलत होते.

या परिषदेच्या समारोप कार्यक्रमात राज्यपाल रमेश बैस यांनी मार्गदर्शन केलं. हे नवे फौजदारी कायदे आधुनिकीकरण आणि आंतरराष्ट्रीय मानकांप्रति देशाची वचनबद्धता दाखवणारे आहेत, त्यांच्या अंमलबजावणीमुळे

मानवाधिकारांचं रक्षण, तसंच आंतरराष्ट्रीय पातळीवर देशाची प्रतिमा उंचावेल, असा विश्वास बैस यांनी व्यक्त केला.

या परिषदेत तिन्ही फौजदारी कायद्यांमधल्या महत्त्वाच्या तरतुदी, बदल आणि त्यांचे संभाव्य परिणाम यावर चर्चा झाली. तंत्रज्ञान क्षेत्रात वेगानं होणारी प्रगती लक्षात घेऊन देशाचे कायदे त्यानुसार बदलणं, पीडित आणि आरोपी, दोघांच्याही हक्कांचं संरक्षण करणं या उद्देशाने हे कायदे तयार केले असल्याचं मत या परिषदेतल्या तीन सत्रांमध्ये सहभागी झालेले न्यायाधीश, कायदेविषयक तज्ञ आणि तपास यंत्रणांच्या प्रतिनिधींनी व्यक्त केलं.

<><><><><>

नॅशनल टेस्टिंग एजन्सीनं यूजीसी नेट परीक्षा ऑफलाइन न घेता ऑनलाइन घेण्याचा निर्णय घेतला आहे. ही परीक्षा २१ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर या कालावधीत विविध केंद्रांवर घेतली जाणार आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे भारत विरुद्ध दक्षिण आफ्रिका कसोटी सामन्यात आज भारताची स्नेहा राणा हिनं ८ गडी बाद करत इतिहास घडवला. चेन्नईच्या एम. ए. चिदंबरम मैदानावर हा सामना सुरू आहे. स्नेहानं आठ तर दीप्ती शर्मानं दोन गडी बाद केले. भारतानं ६ बाद ६०३ धावांवर डाव घोषित केला होता. त्यानंतर भारताने दक्षिण आफ्रिकेचा डाव २६६ धावांत गुंडाळत त्यांना फॉलोऑन दिला. दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेच्या महिला संघानं दिवसअखेर २ बाद २३२ धावा केल्या आहेत. आफ्रिकेकडून खेळताना सुने लुस हिने १०९ धावा केल्यानंतर, लॉरा वोल्वार्ड हिनं नाबाद ९३ धावा केल्या.

<><><><><>

टी ट्वेंटी क्रिकेट विश्वचषक तब्बल १७ वर्षांनी जिंकणाऱ्या भारतीय संघावर चहूकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. भारताच्या या विजयानंतर देशभरात क्रिकेटप्रेमींच्या जल्लोषाला उधाण आलं होतं, मुंबईसह राज्यात सर्वत्र जागोजागी रस्त्यांवर तिरंगा फडकावत क्रिकेट प्रेमींनी विजयोत्सव साजरा केला. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी, काँग्रेस नेते राहुल गांधी, आयसीसीचे माजी अध्यक्ष शरद पवार यांच्यासह विविध क्षेत्रातल्या मान्यवरांनी भारताच्या विजयाबद्दल अभिनंदन केलं आहे.

<><><><><>

भारतीय फूटबॉलपटू भूपिंदर सिंग रावत यांचं वृद्धापकाळानं निधन झालं. ते ८५ वर्षांचे होते. देशांतर्गत फूटबॉल सामन्यांमध्ये ते दिल्ली गॅरिसन, गोरखा ब्रिगेड, मफतलाल यासारख्या संघांमधून खेळले होते. १९६९ मध्ये मलेशियातल्या मेरडेका सामन्यात भारताचं प्रतिनिधीत्व करणाऱ्या भारतीय फूटबॉल संघातही ते होते. अनेक स्थानिक स्तरावरच्या संघांचं तसंच संतोष करंडकसारख्या राज्यपातळीवरच्या स्पर्धांमध्येही त्यांनी फूटबॉल संघांचं नेतृत्व केलं होतं. संतोष करंडक स्पर्धेत त्यांनी महाराष्ट्राचंही प्रतिनिधित्व केलं होतं. अखिल भारतीय फूटबॉल फेडरेशननं रावत यांच्या निधनाबद्दल तीव्र दुःख व्यक्त केलं आहे.

<><><><><>

ट्युनिशिया इथं सुरू असलेल्या जागतिक टेबल टेनिस स्पर्धेच्या महिला दुहेरीत दिया पराग चितळे आणि यशस्विनी घोरपडे या भारतीय जोडीला उपविजेतेपदावर समाधान मानावं लागलं.

**<><><><><>**

आषाढी वारीसाठी पंढरपूरकडे निघालेल्या संत श्री तुकाराम महाराज आणि संत श्री ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालख्या दोन दिवसांच्या मुक्कामासाठी आज पुण्यात पोहोचल्या.

**<><><><><>**

गृह विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सुजाता सौनिक यांची राज्याच्या मुख्य सचिवपदी नियुक्ती करण्यात आली आहे. मावळते मुख्य सचिव नितीन करीर यांच्याकडून त्यांनी आज मंत्रालयात पदभार स्वीकारला.

**<><><><><>**

गेल्या चोवीस तासात, कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मुसळधार पाऊस पडला. कोकणात बहुतांश ठिकाणी, विदर्भात अनेक ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात काही ठिकाणी पाऊस पडला.

येत्या दोन दिवसात मध्य महाराष्ट्र आणि विदर्भात अनेक ठिकाणी तर मराठवाड्यात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता पुणे वेधशाळेनं व्यक्त केली आहे. मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी जोरदार ते मुसळधार पाऊस पडण्याची शक्यता आहे.

***//<><><><><>//***